**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.**

**(दिनांक ०९.०८.२०१६ रोजी तहकुब सभा)**

दि. २०.०९.२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. अनुजा अमितसिंह तेहरा, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| अन्नेवार गंगासागर संदिप | इंदूबाई शिवाजीराव घोगरे |
| प्रविण बालाप्रसाद बियाणी | विनयकुमार गुर्रम |
| संगिता पृथ्वीराज राओत्रे | ज्योती महेंद्र खेडकर |
| सलीमा बेगम नुरुल्ला खान | शर्मा पुष्पाताई राजेश |
| सौ. कदम गंगाबाई नारायण | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| फारुख हुसेन कासीम साब | |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, प्राधिकारी अधिकारी तथा उपआयुक्त (विकास) श्री रत्नाकर वाघमारे, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस.कोलगणे, श्री मुंढे, मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवाड, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. सौ. स्मीता ठाकरे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, , कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**उमेश चव्हाण** जम्मु काश्मीर येथे आतंकी हमल्लयात आपल्या भारतीय १७ जवान शहिद झाले असुन सदरील घटनेचा निषेध करुन जवानांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा ठराव एकमताने घेण्यात यावा.

**विनय गुर्रम** श्री उमेश चव्हाण यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास सर्व सभागृहाचा व माझे अनुमोदन आहेत.

**ठराव क्रं.६३** **ठराव**

जम्मु काश्मीर येथील आंतकी हल्ल्यात भारताचे १७ जवान शहिद झाले असुन त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अपर्ण करते व झालेल्या हल्ल्याचा निषेध हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते करते.

**नगरसचिव** प्रशासना मार्फत एक आयत्या वेळीचा खलील विषय आहेत त्यास मान्यता देण्यात यावी.

## विषय

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(२) नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने त्यांचेकडील अधिकार नियंत्रणाच्या व पुनरिक्षणाच्या अधिन त्यांचे खालील इतर अधिका-यांना प्रदान करण्याची तरतुद आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा वाढलेला व्याप विचारात घेता नागरिकांची कामे सुरळीत पार पाडण्यासाठी कलम ६९(२) मधील नमुद बाबींचे आयुक्तांकडील अधिकार इतर अधिका-यांना प्रदान करणे आवश्यक झालेले आहे. करिता आयुक्तांकडील या कलमा अंतर्गतचे अधिकार आयुक्तांनी ठरविलेल्या मर्यादेपर्यंत इतर अधिका-यांना प्रदान करण्यासाठी स्थायी समिती सभेची मान्यता व्हावी.

**उमेश चव्हाण** प्रशासनाने आयत्यावेळी वरील प्रमाणे जो प्रस्ताव मांडला आहे त्यास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावी.

**सभापती** प्रशासनाचा अधिकार प्रदान करण्याचा जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्र.६४** **ठराव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९(२) नुसार आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने त्यांचेकडील अधिकार नियंत्रणाच्या व पुनरिक्षणाच्या अधिन त्यांचे खालील इतर अधिका-यांना प्रदान करण्याची तरतुद आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा वाढलेला व्याप विचारात घेता नागरिकांची कामे सुरळीत पार पाडण्यासाठी कलम ६९(२) मधील नमुद बाबींचे आयुक्तांकडील अधिकार इतर अधिका-यांना प्रदान करणे आवश्यक झालेले आहे. करिता आयुक्तांकडील या कलमा अंतर्गतचे अधिकार आयुक्तांनी ठरविलेल्या मर्यादेपर्यंत इतर अधिका-यांना प्रदान करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**उमेश चव्हाण** आमची प्रशासनास विनंती आहे एका वर्शात निवडणूक असल्यामुळे आमचे कामे करण्यात यावी

**उपआयुक्त** एक वर्षाचा कालावधी नसुन ऑक्टोंबरच्या १५ तारखेला विधानसभेची आचारसंहीता लागणार आहे डिसेंबरच्या ५ तारखेला संपणार आहे पुन्हा २० डिसेंबर पासुन शिक्षक मतदार संघाची आचारसंहीता लागणार आहे तो १ महिना चालेल

| | |
|---|---|
| **उमेश चव्हाण** | आता कार्यकारी अथ्भयंता साबांवि यांना विचारा कि किती नगरसेवकांनी आपल्याकडे प्रस्ताव दाखल केले आणि कितीच्या निवीदा निघाल्या ही माहिती दयावी. |
| **विनय गुर्रम** | सविस्तर माहिती सभागृहात द्यावी |
| **सभापती** | रोड ग्रँडचे किती प्रस्ताव प्राप्त झाले स्वेच्छा निधी प्रस्ताव किती तयार झाले. |
| **कार्यकारी अभियंता** | १०-१५ नगरसेवकांचे प्रस्ताव आलेले आहेत स्वेच्छा निधीचे प्रस्ताव तयार करणे चालु आहे यापैकी ३ ते ४ नगरसेवकांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. |
| **उमेश चव्हाण** | दोन नगरसेवकांचे अंदाजपत्रक तयार झाले तर कामाला गती कुठे आहे १५ तारखेला आचारसंहीता लागणार असल्याने आमच्या नगरसेवकांचे काय हाल होणार आहेत ते सांगा एवढा उशीर होण्याची कारणे सांगावीत. |
| **सभापती** | आपणास मॅनपावर कमी पडतो काय |
| **कार्यकारी अभियंता** | मॅनपावर तर निश्चीतच कमी पडतो इंजिनिअर वर पुर्ण शहर अवलंबुन आहे मागच्या आठवडया मध्ये गणपती उत्सव होता. |
| **सभापती** | साबांवि ला मॅनपावर मध्ये वाढ करुन देण्यासाठी आयुक्तांना सांगाण्यात येईल. |
| **उपआयुक्त** | आयुक्तांनी पत्र देवुन एक महिना झाला १५ नगरसेवकांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत त्या १५ चे अंदाजपत्रक तयार करुन घ्यावेत. |
| **कार्यकारी अभियंता** | येत्या १५ दिवसाच्या आत रोडग्रँडचे व स्वेच्छा निधीचे अंदाजपत्रक तयार करण्यात येतील. |
| **सभापती** | ८ दिवसाच्या आत अंदाजपत्रक तयार करावेत. |
| **उमेश चव्हाण** | संजय जाधव यांच्याकडे कोणकोणते चार्ज आहेत |
| **सहा.आयुक्त** | माझ्याकडे झोन व कोंडवाडयाचा चार्ज आहे. |
| **उमेश चव्हाण** | सध्या कोंडवाडयाची परिस्थीती अत्यंत खराब असून सर्व जनावरे रस्त्यावर आहेत कोणत्याही एका अधिका-याच्या कोंडवाडयाची जबाबदारी देण्यात यावी. |
| **सभापती** | रस्त्यावर मोठया प्रमाणात जनावरे दिसत आहेत शिवाजी डहाळे यांच्याकडे कुठलाही चार्ज नाही त्यांनी मागे झोनल म्हणुन राहीलेले आहेत त्यांचे काम चांगले आहे त्यामुहे मी आयुक्तांना सांगुन त्यांची पदस्थापना करण्यात येईल. |
| **विनय गुर्रम** | माझ्या प्रभागा मध्ये नालीत गाय पडली होती मी श्री रईस पाशा यांना घेवुन मी गाय काढली आहेत. |
| **सभापती** | मागे आरोग्य विभागाची बैठक घेतली होती डेंगु संदर्भात वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी माहिती दयावी. |
| **वैद्यकिय आरोग्य अधिकारी** | दिनांक ०१ ते १९ पर्यंतचा रक्तनमुने घेतले ज्याचा अहवाल आहे माझ्याकडे आहे. **MPW** तर्फे ६२०७ घराचा सर्वे केला व १४७९५ चा कंटेनरचा सर्वे केला या मध्ये ३०० कंटेनरमध्ये डास आढळून आल्या. |
| **सभापती** | जनजागृतीची कार्यवाही हाती घ्यावी. |
| **वैद्यकिय आरोग्य अधिकारी** | सर्व डॉक्टरांना या कामात नियुक्त केले आहे. |
| **विनय गुर्रम** | सभापती मॅडम असी माहिती जनजागृती केलेली दिसून येत नाही माझ्या प्रीागात निव्वळ पाण्याचा आहे त्या शेजारी शाळेत काणीही आले नाही माझ्या भाग दरवेशनगर **LIC** च्या पाठीमागे बालाजीनगर, माझा प्रभाग आहे मुख्य प्रभावीत एरिया आहेत त्या प्रभागात आपण सर्वे करणे आवश्यक होते ते केले नाहीत विषय सुरु करुन दिढ महिना झालेला आहे फॅगींग कोणतेही मेडीसीन पुरवठा होत नाही माझ्या वार्डात आपण आले नाही मॅडम, **MOH** मॅडम वार्डात आलेच नाहीत. |
| **सभापती** | जेवढे ओपर प्लॉट आहेत त्यावर तळे साचलेले आहे त्यावर काय कार्यवाही करता हे सांगावे औषधी त्या ठिकाणी टाकावेत. |
| **उपआयुक्त** | सगळे शहरात फॉगींग करता येत नाही ज्या ठिकाणी पॉझीटीव्ह एरिया आहे त्या ठिकाणी फॉगींग करता येईल. |
| **विनय गुर्रम** | मनपाकेची एक फॅगींग मशीन चालु आहे दुसरी मशीन दुरुस्त का करण्यात आली नाही याची माहिती देण्यात यावी. एवढा गंभीर विषय नांदेड शहरात चालु आहे आणि आपण मशीन दुरुस्त करत नाही हे योग्य नाहीत. |
| **जिवशास्त्रज्ञ** | ज्या ठिकाणी डेंगुचे रुग्ण आढळतात त्या एरिया मध्ये आपण फॅगींग करतो. डोंगुचे रुग्ण ज्या एरिया मध्ये आहे त्या ठिकाणी आपल्या मार्फत फॅगींग केला जाते. |

| | |
|---|---|
| **उमेश चव्हाण** | मागे एक ठराव करुन दिला होता कि शहरात डेंगु आजाराचे लक्षत काय आहेत त्यासाठी बॅनर लावावे असा ठराव पारीत केला होता त्यावर काय कार्यवाही झाली **ITI**, वजिराबाद, इतर चौकात बॅनर लावले पाहीजे प्रत्येक माणूस आपल्याकडे प्रशिक्षण घेण्यासाठी येवु शकत नाही. डेंगु तपासुन आपणास काय प्रशिक्षण घेता येईल याची माहिती देण्यात यावी अधिका-यावर कार्यवाही होत नाही तर नागरीक आम्हाला विचारतात कि तुम्ही काय झोपा घेतात का ? |
| **विनय गुर्रम** | प्रसिध्दी करण्यासाठी टिव्हीवर दाखवावे. |
| **जिवशास्त्रज्ञ** | गणपती मंडळाना आपण सिडी दिल्या होत्या त्या मधुन जनजागृण करीत आहोत. |
| **उमेश चव्हाण** | थेअटर मध्ये सिडी दाखवतात का याची तपासणी केला का व गणपती मंडळातील कार्यकर्ते हे सीडी ऐकतात का याची पाहणी केली का सीडी देवुन चालणार नाही त्याची फेर तपासणी करणे आवश्यक आहे सिडी देवुन काम संपत नाही आपण याचा पाठपुरावा केला पाहीजे. |
| **सभापती** | रु. १०००/- गाडीला दर दिवसाला व ३८५ रु मजुरांचे एवढी रक्कम आण देवुन रस्त्यावर जनावरे का दिसत आहे हे लक्षात येत नाही लोक दगड मारतात अशी माहिती समोर आली असता त्या लोकांवर ३५३ ची कार्यवाही का करत नाहीत रस्त्या वरील जनावरे पकडण्याची जबाबदारी मनपाकेची आहे. |
| **सहा.आयुक्त कोंडवाडा** | आपण २०२ जनावरे पकडलेली आहेत जनावरे पकडण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. |
| **उपआयुक्त** | २०११ च्या सेनसेस प्रमाणे शहरात ४००० जनावरे आहेत मध्यंतरीच्या काळात १५ दिवस जनावरे पकडून कोंडवाडयात टाकली होती व ४१ जनावरे ही गोशालेला दिली होती गणपतीच्या काळात जनावरे रस्त्यावर येणार नाहीत यासाठी आपण वेगळा स्टाफ नाही सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे जनावरे ही जास्त प्रमाणात रस्त्यावर आहेत ३००० जनावरे कोंडून ठेवण्याची आपली क्षमता नाही. |
| **सभापती** | गोकुळनगर व सिडको भागात आपण कोंडवाडा आहे यातील जनावराचे जे पैसे जमा होतात त्या पैशातुन गुरांचा चारा व पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. |
| **उमेश चव्हण** | जनावरे कोंडवाडयात आल्यास त्या जनावराचा दाखला अनिवार्य करावा सडलेले अन्न खावुन जे जनावरे मरत आहेत त्याची बदनामी ही मनपाकेला झेलावी लागत होती यातुन जातीवादी दंगा निर्माण होण्याची स्थीती निर्माण झाली होती. |
| **सभापती** | स्वच्छता निरीक्षक मार्फत चारही झोन मार्फत नोटीस बाजवण्यात यावी. |
| **विनय गुर्रम** | दाखल घेणे आवश्यक आहे दाखल्यामुळे मनपाकेच्या महसुलात वाढ होते डॉ. रईसोद्दीन यांनी माझ्या डॉग चा दाखला करुन दिला नोटीस दिली म्हणजे विषय संपत नाही तर त्याचा पाठपुरावा केला पाहीजे. |
| **उपआयुक्त** | मनपाकेचे पोलीस पथक हे अतिक्रमण व अनाधिकृत बांधकामासाठी मनपाकेच्या कर्मचा-यांना संरक्षण देण्यासाठी आहे मनपाकेचे इन्फ्रास्ट्रक्चर कमी आहे जनावरे जास्त टाकण्यास जनावराना उभे राण्यासाठी जागा मिळत नाही. किमान २०-२५ माणे कोंडावडयासाठी दिली पाहीजे मनुष्यबळाचा देखील आपल्याकडे अभाव आहे शहरात फक्त एक गोशाला जनावरे घेण्यास तयार आहे पण त्याची मागणी ही जनावरांना चारा देण्यात यावा ही देखील आहे त्यामुळे हा विषय पॉलीसीचा निर्माण होतो आपण नियमीत गोशालावाल्यास चारा देवु शकत नाही. |
| **फारुख हुसेन** | स्वच्छता निरीखक निलंबीत णाला त्याच्या जागी कोणताही दिले नाही माझ्या एरिया भाजीमंढी आहेत त्या ठिकाणी जनावरे भरपुर असतात त्यावर उपाय काय आहे कच-यासाठी विशेष माझ्या वार्डात अतिशय गंभीर आहे बकरा मार्केट भाजी मार्केट हे माझ्या प्रभागात आहे माझ्या प्रभागात कोणताही स्वच्छता निरीक्षक नियुकत केले आहे हे सांगावे. |
| **उमेश चव्हाण / विनय गुर्रम** | विषयपत्रीकेत विषय क्रं. ७ हा मी व गुर्रम यांनी ठेवला होता आम्ही दोघांनी हा विषय त्रुटीच्या संदर्भात यात मनपाकेची बदनामी होत असल्यामुळे मागे घेत आहोत. |
| **विनय गुर्रम** | सभापती विनय गिरडे यांच्या काळात हे प्रस्ताव ठेवला होता त्रुटीच्या उपसमीतीचा अहवाल आपल्याकडे सादर केला त्याला जवळपास ३ महिणे पुर्ण झाले आहेत त्यावर प्रशासना मार्फत काय कार्यवाही करण्यात आली हे स्पष्ट करावे. |
| **सभापती** | श्री कंदेवार यांनी माहिती दयावी. |
| **मुख्यलेखाधिकारी** | मा. सभापती महोदय तत्कालीन आयुक्त यांच्या समक्ष संचिका या विषयाची सादर केली होती त्यात त्यांनी हा विषय पाण्याशी निगडीत असल्यामुळे पाणी पुरवठा विभागा मार्फत कार्यकारी अभियंता यांनी सविस्तर अहवाल दयावा असे पृष्ठांकन केले आहे ती संचिका कार्यकारी अभियंता श्री अंधारे यांच्याकडे पाठवले आणि त्यांनी एकूण ०३ स्मरणपत्र सुध्दा दिले त्यावर त्यांनी आयुक्तांनी कांही |

| | |
|---|---|
| | मुदे उपस्थीत करुन माहिती देण्यास सांगीतले आयुक्तांनी जे निर्देश देतील त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे त्या पत्रात नमुद आहे. |
| **सभापती** | श्री अंधारे तूम्हाला या बाबत काय अडथळे येत आहेत याचा खुलासा करावा. |
| **कार्यकारी अभियंता पापु** | या प्रकरणी सविस्तर माहिती पुढील मिटींगमध्ये सादर करतो. |
| **सभापती** | ही आपली शेवटी संधी राहील यानंतर आपणास संधी देण्यात येणार नाही ना इलाजास्तव अहवाल मिळालाच नाही तर मला कार्यवाही करावी लागेल. |
| **विनय गुर्रम** | सभापती महोदय ही रुलींग दिल्याबदल आपले भिनंदन या प्रकरणात कुठलाही प्रोग्रेस दिसत नाही मी यात एसीबीला चौकशी करण्यात येईनल अशी मी मागणी करतो व मी जनहित याचिका दाखल करत आहे हे मी सभागृहात सांगात आहे. |
| **उमेश चव्हाण** | सभापतीची रुलींग झाल्यावर त्यावर बोलण्याची गरज नाही. |
| **विनय गुर्रम** | सभापतीच्या परवानगीने मी बोलले आहे अभिनंदनही केले आहे त्यामुळे उमेश चव्हाण हे मला बोल नये असे का म्हणतात. |
| **उमेश चव्हाण** | पुढच्या मिटींग पर्यंत जर तुम्हाला अहवाल मिळाला नाही तर तुम्ही काय कार्यवाही करायची ती करा. |
| **विनय गुर्रम** | नगरसेवक या नात्याने मी झोपन अधिका-यांना अनाधिकृत बांधकामच्या संदर्भात पत्र दिले आहे त्याला ६-७ महिणे झाले आहेत संबंधीताण कोणतीही नोटीस बजावण्यात आलेली नाही मला शंका येते कि झोपनचा त्यात काय इंटरेस्ट आहे एक बांधकाम परवानगी अशी आहे अद्यापही मनपाकेची परवानगी भेटली नाही बांधकाम पुर्ण झाले त्यांची दुकानदारी चालवतोय संबंधीत **HP** केली असती तर बरे झाले असते त्याला ३०-४० लाख रुपये दंड लागु शकतो एवढे नुकसान झालेला आहे. श्री अटकोरे साहेबांनी ५४, ५५ ची नाटीस दिल्या असे स्पष्टीकरण दिले हाते दिड महिणा होवुन गेला तरी त्यावर काही कार्यवाही झाली नाही त्यानी कार्यवाही करावी यासाठी त्यांना आदेशीत करावे. |
| **सहा.आयुक्त ब** | संबंधीतास नोटीस दिली नोटीसीचे उत्तर देखील आलेले आहे त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे माझ्या कार्यकाळात त्यांना नोटीस दिलेली आहे त्याची दुसरीही तक्रार आहे मी पार्कीगच्या संदर्भातील ती देखील श्री मुंढे यांच्याकडे संचिका सादर केली आहे सध्या गणपती असल्यामुळे थांबण्याच्या सुचना दिलेल्या आहेत त्यानंतर कार्यवाही करण्यात येईल २-४ दिवसात कार्यवाही करण्यात येईल. |
| **सभापती** | विनय गुर्रम यांनी जी तक्रार दाखल केलेली आहे त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. |
| **उमेश चव्हाण** | या स्थायी समितीचया मिटींग मध्ये टी.पी. नसेल तर काय उपयोग आहे ही समिती ही एक कॅबीनेट आहे त्या विभागाची उत्पन्नाशी निगडीत आहे त्याच विभागाचे अधिकारी नाहीत हे योग्य नाही आम्ही चर्चा कोणाशी करावी अनाधिकृत बांधकाम शहरात का वाढतात **TP** वर स्थायी समिती मार्फत काय कार्यवाही करण्यात येते तो करावी या सभेत बांधकाम३ परवानग्या किती पेंडींग आहेत व का प्रलंबीत आहे तत्याची कारणे काय याची माहिती पाहीजे होती त्यामुळे अनाधिकृत बांधकामे ही पाडणारच आहेत. ६० दिवसात बांधकाम परवानगी देणे आवश्यक आहे परंतु ८-९ महिण्या पासुन परवानग्या या प्रलंबीत आहेत कोणतीही नोटीस आपण त्यांना दिलेली नाहीत कागदपत्रे पुर्ण घेवुनच परवानगी देण्यात यावी माझ्या वार्डातील तीन केसेस आहेत त्यांनी टोकन घेतले तरी त्यांना बांधकाम परवानगी मिळालेली नाही व त्यांना कोणत्याही कागदपत्रासाठी पत्र देखील दिलेले नाही हे उत्पन्नाशी निगडीत असल्यामुळे तात्काळ बांधकाम परवानग्या देण्यात याव्यात आपल्याकडून टोच नकाशाची मागणी करण्यात येत आहे. |
| **विनय गुर्रम** | माझ्या विषयावर निर्णय न घेता त्यांनी दुसराच विषय सुरु केला हे योग्य नाही. |
| **उमेश चव्हाण** | माझे बोलणे चालु असतांना अपण बालु नये आपणास मिटींग चालु दयाची नाही त्यामुळे विषयपत्रीका पास करण्यात यावी. विषयपत्रीका पास करुन सर्व अधिकारी सभापतींना देण्यात येतात. |
| **सभापती** | श्री विनय गुर्रम यांनी दिलेल्या पत्रावर ताबडतोब कार्यवाही करण्यात यावी रुलींग दिल्यावर पुन्हा बोलण्याची गरज नाही आपल्या विषयावर रुलींग दिलेली आहे. |
| **विनय गुर्रम** | मी आज तक्रार दिलेली नाही त्यामुळे मला तात्काळ निर्णय पाहीजे आहे माझी तक्रार खुपव दिवसाची आहे. |
| **उमेश चव्हाण** | यांना कांही चर्चा करायची नाही |

**उपआयुक्त** स्थायी समिती मध्ये आयुक्तांच्या वतीने उपआयुक्त यांनी प्राधिकृत केलेले आहे अनाधिकृत बांधकामावर नियंत्रण करणे ही सर्वस्वी जबाबदारी आयुक्तांची आहे एखादे बांधकाम पाडावे कि थांबवावे हे अधिकारी स्थायी समितीला नाही हे सर्व अधिकारी कायदयाने आयुक्तांना आहेत. आयुक्तांच्या वतीने उपआयुक्त असल्याने आपल्या प्रभागातील सर्व होत असलेले अनाधिकृत बांधकामे याची पाहणी एका महिण्याच्या आत करु आपण ज्या तक्रारी दिल्या आहेत त्याचे बांधकाम पाडण्याची कार्यवाही एका महिण्याच्या आत करु.

**विनय गुर्रम** माझी तक्रार वार्डापुरती नसुन वार्डा बाहेरील आहे त्यावर कार्यवाही करावी.

**उमेश चव्हाण** नगरसेवकांच्या घरा पासुन सुरुवात करण्यात यावी.

**विनय गुर्रम** नगरसेवक केवळ त्यांच्या कार्यक्षेत्रापुरताच तक्रार देवु शकत नाही तर इतरही वार्डातील बाबीं सांगु शकतो.

**सभापती** ही सर्व जबाबदारी स्थायी समितीची नसल्याने आयुक्तांने अनाधिकृत बांधकामवर आळा घालण्यासाठी कार्यवाही करावी.

**उपायुक्त** अनाधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याची जबाबदारी ही आयुक्तांवर असल्याने त्यावर त्यांनी चार झोपनला पावर डिलीगेट केले असुन त्या अंतर्गत एक **BI**, दिलेला आहे त्या मार्फत कार्यवाही करण्यात येते शहरातील प्रत्येक अनाधिकृत बांधकामावर नोटीस देवुन कार्यवाही झाली पाहीजे. ते पाडले पाहीजे आपल्या तक्रार देण्यासाठी कुठलीही बंधन नाही आपण कुठलेही तकार देवु शकतात तुम्ही तक्रार दिली म्हणजे त्या कामाची प्रायोरीटी ठरण्याचे अधिकार हा आपणास नाही तो मनपाकेचया प्रशासनाचा आहे पुर्ण अधिकार हे सभापतीना देण्यात येतात.

**उमेश चव्हाण** दोनही विषयपत्रीका पास करण्यात येतात.

**सभापती** श्री विनय गुर्रम यांची विरोध नोंदवुन विषयपत्रीका पास करण्यात येते विषय क्रं. ११ टूरच्या संदर्भात आहे ते पेंडींग ठेवण्यात यावे

## विषय क्रं.०१

शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण-२९९१६/प्र.क्र.२४/नवि-२९ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २२ जानेवारी २०१६ नुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/कोंडवाडा/४४८८/१६ दिनांक १२.०७.२०१६ व अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड कोंडवाडा विभागात कोकुळनगर येथे ०१ व सिडको येथे ०१ असे एकूण ०२ कोडवाडे आहेत.

कोंडवाडा विभागात अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे मोकाट जनावरे पकडण्यासाठी चार वेळा निविदा काढण्यात आली होती. निविदास प्रतिसाद मिळालेला नाही सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे मोकाट जनावरे रस्त्यावर फिरत / बसत आहेत त्यामुळे रहदारीस अडथळा होत आहे त्या बाबत तक्रारी प्राप्त होत आहे.

रात्रीच्या वेळी मोकाट जनावरे पकडण्यासाठी प्रथम ३० दिवस (एक महिण्यासाठी) दिनांक ०९.०७.१६ ते ०७.०८.१६ पर्यंत रात्री १०.०० ते सकाळी ०५.०० या वेळेत १ टाटा एस खाजगी वाहन व १० कंत्राटी मजुर लावणे आवश्यक आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांच्या दरानुसार खाजगी वाहन (ड्रायव्हर व डिझेलसह) MH-२६ AD-६७३७ टाटा एस प्रतिदिन रुपये १०००/- प्रमाणे ३० दिवसांचे ३०,०००/- व खाजगी मजुर लावण्यासाठी शासन परिपत्रकामध्ये नमुद दर प्रतिमहा रुपये ११,५००/- प्रमाणे प्रतिदिन प्रती मजुर रुपये ३८४/- प्रमाणे एकूण १० मजुरांचे ३० दिवसांचे एकूण रुपये १,१५,०००/- व टाटा एस चे ३०,०००/- असे एकूण रुपये १,४५,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष पंचेचाळीस हजार रुपये) दर आठवडयाला मजुरांची मजुरी व खाजगी वाहनास देयक देण्यासाठी श्री किशोर देरमाळे वरिष्ठ लिपीक कोंडवाडा विभाग यांच्या नावे अग्रीम रक्कम रुपये १,४५,०००/- देण्यासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम ७३ नुसार प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सादर.

सदरील खर्च सालसन २०१६-१७ च्या मनपा अंदाजपत्रकातील संबंधीत लेखाशिर्षकातुन करण्यात यावा

**सभापती** प्रशासना आदेशास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.६५** **ठराव**

शासन परिपत्रक क्रं. संकीर्ण-२९९१६/प्र.क्र.२४/नवि-२९ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २२ जानेवारी २०१६ नुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/कोंडवाडा/४४८८/१६ दिनांक १२.०७.२०१६ व अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड कोंडवाडा विभागात कोकुळनगर येथे ०१ व सिडको येथे ०१ असे एकूण ०२ कोडवाडे आहेत.

कोंडवाडा विभागात अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे मोकाट जनावरे पकडण्यासाठी चार वेळा निविदा काढण्यात आली होती. निविदास प्रतिसाद मिळालेला नाही सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे मोकाट जनावरे रस्त्यावर फिरत / बसत आहेत त्यामुळे रहदारीस अडथळा होत आहे त्या बाबत तक्रारी प्राप्त होत आहे.

रात्रीच्या वेळी मोकाट जनावरे पकडण्यासाठी प्रथम ३० दिवस (एक महिण्यासाठी) दिनांक ०९.०७.१६ ते ०७.०८.१६ पर्यंत रात्री १०.०० ते सकाळी ०५.०० या वेळेत १ टाटा एस खाजगी वाहन व १० कंत्राटी मजुर लावणे आवश्यक आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांच्या दरानुसार खाजगी वाहन (ड्रायव्हर व डिझेलसह) MH-२६ AD-६७३७ टाटा एस प्रतिदिन रुपये १०००/- प्रमाणे ३० दिवसांचे ३०,०००/- व खाजगी मजुर लावण्यासाठी शासन परिपत्रकामध्ये नमुद दर प्रतिमहा रुपये ११,५००/-

प्रमाणे प्रतिदिन प्रती मजुर रुपये ३८४/- प्रमाणे एकूण १० मजुरांचे ३० दिवसांचे एकूण रुपये १,१५,०००/- व टाटा एस चे ३०,०००/- असे एकूण रुपये १,४५,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष पंचेचाळीस हजार रुपये) दर आठवडयाला मजुरांची मजुरी व खाजगी वाहनास देयक देण्यासाठी श्री किशोर देरमाळे वरिष्ठ लिपीक कोंडवाडा विभाग यांच्या नावे अग्रीम रक्कम रुपये १,४५,०००/- देण्यासाठी महाराष्ट्र मनपा अधिनियमातील कलम ७३ नुसार प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

## विषय क्रं.०२

कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/४९६४/२०१६ अन्वये मा. महापौर नावाशमनपा नांदेड यांचे पत्र दि. २४.०६.२०१६ मनपा तर्फे **इफ्तार पार्टीचे** आयोजन करण्यासाठी सुचीत केल्यानुसार मंगळवार दिनांक ०५.०७.२०१६ रोजी मुख्य कार्यालय प्रशासकीय इमारतीत मनपा नांदेड येथे संध्याकाळी ७.०० वाजता इपतार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील कार्यक्रमासाठी मा. महापौर यांचे वतीने मा.आमदार / स. पदाधिकारी / स. सदस्य / स. सदस्या यांना आणि सर्व अधिकारी/कर्मचारी मनपा नांदेड व शहरातील प्रतिष्ठीत मुस्लीम बांधवाना निमंत्रीत करण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने **श्री मोबीन अहेमद खलील अहेमद (कुक)** यांनी सादर केलेले बि.क्रं. ११७ दिनांक ०५.०७.२०१६ अन्वये सादर केलेल्या देका प्रमाणे **रुपये ८०,०००/-** (अक्षरी रु. अंशी हजार फक्त) देकातील तपशिलानुसार इफ्तार पार्टीच्या कार्यक्रमावर खर्च झालेला आहे सदरचे आदेशव्दारे खर्चास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात आली आहे.

यावर होणारा खर्च सानसन २०१६-१७ च्या सबंधीत शिर्षकाखालील तरतुदीतुन करण्यात यावा आणि सदरचे रक्कमेचा धनादेश श्री मोबीन अहेमद खलील अहेमद नांदेड यांचे नावा नेदण्यात आली **त्याची नोंद घेणे बाबत.**

**सभापती** प्रशासनाचे आदेशाची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं.६६** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/४९६४/२०१६ अन्वये मा. महापौर नावाशमनपा नांदेड यांचे पत्र दि. २४.०६.२०१६ मनपा तर्फे **इफ्तार पार्टीचे** आयोजन करण्यासाठी सुचीत केल्यानुसार मंगळवार दिनांक ०५.०७.२०१६ रोजी मुख्य कार्यालय प्रशासकीय इमारतीत मनपा नांदेड येथे संध्याकाळी ७.०० वाजता इपतार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील कार्यक्रमासाठी मा. महापौर यांचे वतीने मा.आमदार / स. पदाधिकारी / स. सदस्य / स. सदस्या यांना आणि सर्व अधिकारी/कर्मचारी मनपा नांदेड व शहरातील प्रतिष्ठीत मुस्लीम बांधवाना निमंत्रीत करण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने **श्री मोबीन अहेमद खलील अहेमद (कुक)** यांनी सादर केलेले बि.क्रं. ११७ दिनांक ०५.०७.२०१६ अन्वये सादर केलेल्या देका प्रमाणे **रुपये ८०,०००/-** (अक्षरी रु. अंशी हजार फक्त) देकातील तपशिलानुसार इफ्तार पार्टीच्या कार्यक्रमावर खर्च झालेला आहे सदरचे आदेशव्दारे खर्चास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात आली आहे.

यावर होणारा खर्च सानसन २०१६-१७ च्या सबंधीत शिर्षकाखालील तरतुदीतुन करण्यात यावा आणि सदरचे रक्कमेचा धनादेश श्री मोबीन अहेमद खलील अहेमद नांदेड यांचे नावा देण्यात आली **त्याची नोंद हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते.**

## विषय क्रं.०३

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/ जवमा/ ५२९७/१६ दिनांक २६ जुलै २०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीमधील **हाउसकिपींगचे (साफसफाई, लिफट, टॉयलेट व गार्डनिंग) काम मे. व्यवस्थापक संचालक, ओमसाई संस्था नांदेड** यांच्याशी दिनांक २८.०६.२०१६ रोजी वाटाघाटीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे रुपये १,८८,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष टठयांशी हजार फक्त) दर महिना या प्रमाणे व रुपये ५०,०००/- अनामत रक्कम जमा करुन स्टॅम्प पेपरवर शपथपत्र करुन दिल्यानंतर दिनांक ०१.०८.२०१६ पासुन दि. ३१.०७.२०१७ पर्यंत निविदेतील नियम सदर हाउसकिपींगचे काम देण्यात आले **त्याची नोंद घेणे बाबत.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं.६७** **ठराव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/ जवमा/ ५२९७/१६ दिनांक २६ जुलै २०१६ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकिय इमारतीमधील **हाउसकिपींगचे (साफसफाई, लिफट, टॉयलेट व गार्डनिंग) काम मे. व्यवस्थापक संचालक, ओमसाई संस्था नांदेड** यांच्याशी दिनांक २८.०६.२०१६ रोजी वाटाघाटीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे रुपये १,८८,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष टठयांशी हजार फक्त) दर महिना या प्रमाणे व रुपये ५०,०००/- अनामत रक्कम जमा करुन स्टॅम्प पेपरवर शपथपत्र करुन दिल्यानंतर दिनांक ०१.०८.२०१६ पासुन दि. ३१.०७.२०१७ पर्यंत निविदेतील नियम सदर हाउसकिपींगचे काम देण्यात आली **त्याची नोंद हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते.**

## विषय क्रं.०४

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) व (ड) अन्वये कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/ साबांवि/५६२६/१६ दिनांक ०१.०८.२०१६ नुसार** नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत नावाशमनपा हद्दीत **शांतीधाम गोवर्धनघाट येथील**

**स्मशानभुमीत १० शवदाहणी सांगडे बसविणे व सि.सि. ओटयाचे बांधकाम करणेसाठी** (रु. ८,००,०००/-) निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ निविदा प्राप्त झाली.

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. पठाण मोईज अहेमद खान नांदेड यांची निविदा सर्वात कमी दराची असून जी अंदाजपत्रकीय दराची निविदा असल्यामुळे सदर कामासाठी **मे. पठाण मोईज अहेमद खान नांदेड यांची अंदाजपत्रकिय दराची निविदा मंजुर करण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.**

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाची नोंद घेण्यात येतो.

**ठराव क्रं.६८** **ठराव**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) व (ड) अन्वये कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/ साबांवि/५६२६/१६ दिनांक ०१.०८.२०१६ नुसार** नाविन्यपुर्ण योजना अंतर्गत नावाशमनपा हद्दीत **शांतीधाम गोवर्धनघाट येथील स्मशानभुमीत १० शवदाहणी सांगडे बसविणे व सि.सि. ओटयाचे बांधकाम करणेसाठी** (रु. ८,००,०००/-) निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ निविदा प्राप्त झाली.

निविदाच्या तुलनात्मक तक्त्यानुसार मे. पठाण मोईज अहेमद खान नांदेड यांची निविदा सर्वात कमी दराची असून जी अंदाजपत्रकीय दराची निविदा असल्यामुळे सदर कामासाठी **मे. पठाण मोईज अहेमद खान नांदेड यांची अंदाजपत्रकिय दराची निविदा मंजुर करण्यात आली त्याची नोंद हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते.**

## विषय क्रं.०५

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र क अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत सर्व कामे करणेसाठी जसे प्रमुख रस्ते वेळोवेळी दुरुस्त करणे व डागडुजी करणे जेणे करुन सदर क्षेत्रामधील शहरातील रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होवुन भविष्यात कोणत्याही प्रकारची हाणी होणार नाही. **मनपा मालकीच्या इमारतीची किरकोळ दुरुस्ती करुन घेणे तसेच दरवर्षी साजरे होणारे सण, उत्सव, जयंती, पुण्यतिथी, VIP दौरे, गणेश उत्सव, दुर्गादेवी, रमजान ईद, दसरा, दिवाळी, ई. निमित्त दरवर्षी लागणारी कामे सालसन २०११-१२ पासुन क्षेत्र निहाय कंत्राटदार नेमुण वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र क अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत लागणारा रुपये **४३,५८,०००/-** खर्चाची प्रशासकिय आर्थीक मान्यता प्रदान झाल्यानुसार निविदा सुचना क्रं. ३११९/२०१६ दिनांक ०९.०६.२०१६ अन्वये दैनिक उद्याचा मराठवाडा / दैनिक दलीतवाणी या वर्तमानपत्रात तिस-यांदा निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

क्षेत्र क अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत एकूण ५ निविदा प्राप्त झाल्या असुन प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक ०२.०७.२०१६ रोजी उघडण्यात आले असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| **०१** | **मे कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड** | **७% कमी दराने** |
| ०२ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ५.७८६% कमी दराने |
| ०३ | पठाण मोईज अहेमद खान नांदेड | १.५१% कमी दराने |
| ०४ | एल ॲन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड | ७% जास्त दराने |
| ०५ | स्वाल इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | ५% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा ७% कमी दराची आहे.**

**करिता क्षेत्र क अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती ची कामे करणेसाठी मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ७% कमी दराची निविदा मंजुरीस्तव व लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.**

**सभापती** प्रशासनाचा निविदा मंजुरीचा विषय मंजुर करण्यात येतो

**ठराव क्रं.६९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र क अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत सर्व कामे करणेसाठी जसे प्रमुख रस्ते वेळोवेळी दुरुस्त करणे व डागडुजी करणे जेणे करुन सदर क्षेत्रामधील शहरातील रस्त्यावरील वाहतुक सुरळीत होवुन भविष्यात कोणत्याही प्रकारची हाणी होणार नाही. **मनपा मालकीच्या इमारतीची किरकोळ दुरुस्ती करुन घेणे तसेच दरवर्षी साजरे होणारे सण, उत्सव, जयंती, पुण्यतिथी, VIP दौरे, गणेश उत्सव, दुर्गादेवी, रमजान ईद, दसरा, दिवाळी, ई. निमित्त दरवर्षी लागणारी कामे सालसन २०११-१२ पासुन क्षेत्र निहाय कंत्राटदार नेमुण वार्षीक देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येत आहेत.**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत क्षेत्र क अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत लागणारा रुपये **४३,५८,०००/-** खर्चाची प्रशासकिय आर्थीक मान्यता प्रदान झाल्यानुसार निविदा सुचना क्रं. ३११९/२०१६ दिनांक ०९.०६.२०१६ अन्वये दैनिक उद्याचा मराठवाडा / दैनिक दलीतवाणी या वर्तमानपत्रात तिस-यांदा निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

क्षेत्र क अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती अंतर्गत एकूण ५ निविदा प्राप्त झाल्या असुन प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समिती समोर दिनांक ०२.०७.२०१६ रोजी उघडण्यात आले असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| **०१** | **मे कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड** | **७% कमी दराने** |
| ०२ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ५.७८६% कमी दराने |
| ०३ | पठाण मोईज अहेमद खान नांदेड | १.५१% कमी दराने |
| ०४ | एल ॲन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड | ७% जास्त दराने |
| ०५ | स्वाल इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | ५% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा **मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रक दरापेक्षा ७% कमी दराची आहे.**

**करिता क्षेत्र क अंतर्गत वार्षीक देखभाल दुरुस्ती ची कामे करणेसाठी मे. कामारीकर कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ७% कमी दराची निविदा मंजुर करुन व लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.**

## विषय क्रं.०६ प्रस्ताव

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रात घरोघर कचरा उचलणे व शहरातील नाल्यांची नियमीत साफसफाई नियमित करणेसाठी महापालिकेने ए टू झेड इन्फ्राक्ट्रक्चर लि.गुरगांव या कंपनीची नियुक्ती सन 2012 पासून केली असून शहरातुन प्रतिदिन उचलण्यात आलेल्या कच-याच्या वजनाच्या प्रमाणात देयक अदाई करण्याची करारनाम्यात तरतुद आहे.

महापालिकेने ए टू झेड इन्फ्राक्ट्रक्चर लि.गुरगांव यांचेशी केलेल्या करारातील अट क्रं.1.0 आणि 1.1 मध्ये स्वयंस्पष्ट पणे नमूद केले आहे की, शहरातील नाल्यांची साफसफाई नियमित करणे त्यांना बंधनकारक आहे.

परंतू शहरातील विविध भागातील क्षेत्रीय अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांनी प्रमाणित करुन दिलेल्या अहवालाच्या आधारे ए टू झेड इन्फ्राक्ट्रक्चर लि.गुरगांव या कंपनीने शहरातील नाल्यांची जेसीबी मशीनव्दारे साफसफाई करुन गाळ उचलल्याबाबत एप्रिल 2015 ते फेब्रुवारी 2016 या कालावधीत जवळपास करारानाम्यात नमूद केलेली अट नजरअंदाज करुन सदर कंपनीला रु.3 कोटी जास्त अदा केले असून या कंपनीने शहरातील नाल्यातील जेसीबी मशीनव्दारे काढलेला गाळ वजनकाटयावर न नेता, इतरत्र टाकून त्याचे अंदाजित वजन बिलामध्ये ग्राहय धरुन, महापालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 56 (2) चे पोटकलम (इ) असलेल्या तरतूदीनूसार महापालिकेच्या या आर्थिक नुकसानीची भरपाई संबंधित सहा.आयुक्त (स्वच्छता), क्षेत्रीय अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्या वेतनातून वसूल करुन, केलेल्या आर्थिक अनियमिततेबद्दल संबंधितांविरुध्द योग्यती कार्यवाही करणे करीता ही स्थायी समिती सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक**:- श्री उमेश चव्हाण **अनुमोदक** :- श्री विनय गुर्रम

**उमेश चव्हाण** मी माझा प्रस्ताव परत घेत आहे

**सभापती** उमेश चव्हण हे आपला विषय परत घेत असल्याने सदरचा विषय विषय पत्रिके वरुन वगळण्यात येतो.

## विषय क्रं.०७ प्रस्ताव

दिनांक २६ मार्च १९९७ रोजी नांदेड व वाघाळा या दोन नगरपालिकेचे एकत्रीकरण करुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे

महापालिका अस्तित्वात आल्यापुर्वी भुतपुर्व वाघाळा नगरपालिकेने एकूण १९ कर्मचा-यांना पदोन्नती, १० कर्मचा-यांना नियुक्ती दिली होती. सदर नियुक्ती व पदोन्नती देतांना विहित पध्दतीचा अवलंब झाला नसल्याने महापालिकेने दिनांक १३.०८.१९९७ रोजी आदेश काढून सदर नियुक्ती रद्द केली व पदोन्नत्या रद्द केल्या होत्या.

महापालिकेच्या दिनांक १३.०८.१९९७ च्या आदेशा विरुध्द संबंधीत कर्मचा-यांनी मा. औद्योगीक न्यायालय जालना येथे केस क्रमांक ULP १५३/९७ या दाखल केलेल्या प्रकरणात औद्योगीक न्यायालयाने महापालिकेचे दिनांक २९.०७.१९९८ रोजी सदरचे आदेश रद्द केले आहे.

मा. औद्योगीक न्यायालय जालना येथे दिनांक २९.०७.१९९८ रोजी झालेल्या निर्णया विरुध्द महापालिकेने मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे याचिका क्रं. ४०६९/९८ अपिल दाखल केले असून सदर अपिल आज पावेतो प्रलंबीत आहे. तसेच या नियमबहाय पदोन्नत्या नियुक्ती बाबत सन २०१२-१३ महालेखाकार कार्यालय नागपुर यांचेकडून आक्षेप घेण्यात आलेला आहे.

मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथील या प्रकरणातील मनपाकेचे कायदे सल्लागार यांनी दिनांक २१.१२.२०१५ रोजी दिलेल्या अभिप्रायास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८१ (ह) मधील तरतुदीनुसार सदर अपिल मागे न घेता या प्रकरणात विशेष बाब म्हणुन अन्य कायदे सल्लागाराची नियुक्ती करुन सदर याचिका नियमानुसार तातडीने निकालीने काढण्याची ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते समंत करते.

**सुचक**:- श्री उमेश चव्हाण **अनुमोदक** :- श्री विनय गुर्रम

**सभापती** स. सदस्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.७०** **ठराव**

दिनांक २६ मार्च १९९७ रोजी नांदेड व वाघाळा या दोन नगरपालिकेचे एकत्रीकरण करुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे

महापालिका अस्तित्वात आल्यापुर्वी भुतपुर्व वाघाळा नगरपालिकेने एकूण १९ कर्मचा-यांना पदोन्नती, १० कर्मचा-यांना नियुक्ती दिली होती. सदर नियुक्ती व पदोन्नती देतांना विहित पध्दतीचा अवलंब झाला नसल्याने महापालिकेने दिनांक १३.०८.१९९७ रोजी आदेश काढून सदर नियुक्ती रद्द केली व पदोन्नत्या रद्द केल्या होत्या.

महापालिकेच्या दिनांक १३.०८.१९९७ च्या आदेशा विरुध्द संबंधीत कर्मचा-यांनी मा. औद्योगीक न्यायालय जालना येथे केस क्रमांक ULP १५३/९७ या दाखल केलेल्या प्रकरणात औद्योगीक न्यायालयाने महापालिकेचे दिनांक २९.०७.१९९८ रोजी सदरचे आदेश रद्द केले आहे.

मा. औद्योगीक न्यायालय जालना येथे दिनांक २९.०७.१९९८ रोजी झालेल्या निर्णया विरुध्द महापालिकेने मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे याचिका क्रं. ४०६९/९८ अपिल दाखल केले असून सदर अपिल आज पावेतो प्रलंबीत आहे. तसेच या नियमबहाय पदोन्नत्या नियुक्ती बाबत सन २०१२-१३ महालेखाकार कार्यालय नागपुर यांचेकडून आक्षेप घेण्यात आलेला आहे.

मा. उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथील या प्रकरणातील मनपाकेचे कायदे सल्लागार यांनी दिनांक २१.१२.२०१५ रोजी दिलेल्या अभिप्रायास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८१ (ह) मधील तरतुदीनुसार सदर अपिल मागे न घेता या प्रकरणात विशेष बाब म्हणुन अन्य कायदे सल्लागाराची नियुक्ती करुन सदर याचिका नियमानुसार तातडीने निकालीने काढण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. आयुक्तांनी नियमानुसार पुढील वैद्यानिक कार्यवाही करावी.

## विषय क्रं.०८ प्रस्ताव

शहरामध्ये सुरु असलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक**:- विनय गुर्रम **अनुमोदक** :- उमेश चव्हाण

**सभापती**

**ठराव क्रं.७१** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रशासना मार्फत नागरीकांना बांधकाम परवानगी देण्यात येत नसल्याने महापालिका आर्थीक नुकसान होत असल्याने प्रशासन जबाबदार आहेत. त्यामुळे नागरीक बांधकाम परवानगी प्रस्ताव कार्यालयास सादर केल्यानंतर टोकन नंबर प्राप्त झाला असल्याने ते बांधकाम करुन घेत आहेत. करिता प्रशासना मार्फत तात्काळ बांधकाम परवानगी देण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते समंत करते.

सभापती दिनांक ०९.०८.२०१६ रोजीच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे दिनांक २०.०९.२०१६ च्या सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येतो.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **सभापती** |
| **नावाशमनपा नांदेड** | **स्थायी समिती** |
| | **नावाशमनपा नांदेड** |